# मुंबई विद्यापीठ

विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग
क्र.वि.नि.वि.वि/१६/२०१८
१३ नोव्हेंबर, २०१८

**परिपत्रक :–**

विषय :– विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर गुणवंत शिक्षकेतर कर्मचा–यांची शिफारस करणेबाबत.

महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठातर्फे महाविद्यालयीन स्तरावर सन २०१७–१८ करिता गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचा–यांचा विद्यापीठातर्फे, विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर निवड करून, तसेच विद्यापीठातर्फे निवड होणा–या गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचा–यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह तसेच रोख रूपये ५,०००/– (रूपये पाच हजार फक्त) देऊन गौरविण्यात येईल.

या परिपत्रकाद्वारे आपणांस असे कळविण्यात येते की, महाविद्यालयाच्या सेवेत नाविण्यपूर्ण, कौशल्यपूर्ण आणि आदर्शवत काम केलेले आहे अशा शिक्षकेत्तर कर्मचा–यांचा यथोचित सत्कार २६ जानेवारी, २०१९ रोजी प्रजासत्ताक दिनी करण्याचे ठरविले आहे.

आपणांस अशी विनंती करण्यात येते की, ज्या महाविद्यालयीन शासनमान्य, अनुदानित व विनाअनुदानित संलग्नित महाविद्यालयातील ज्यांची किमान **२० वर्षे सेवा** झालेली आहे तसेच ज्यांनी विशेष गुणवत्ता व अर्हता धारण केली आहे अशा एक किंवा दोन पात्र शिक्षकेत्तर कर्मचा–यांचे प्रस्ताव संपूर्ण माहितीसह **दि. ३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंत सहायक कुलसचिव,** विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, कक्ष क्र. **१३२, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे** पाठवावेत.

तसेच ज्या शिक्षकेत्तर कर्मचारी यांची शिफारस करावयाची, त्यांची माहिती सोबत जोडलेल्या अर्जामध्ये नेमणूकीच्या पत्राची प्रत, तसेच अन्य सर्व कागदपत्रांच्या सत्य प्रती तसेच पोलिस अहवाल, **सहप्रस्तावासोबत ३ प्रतित** पाठविणे आवश्यक आहे. (तसेच संबंधित कर्मचा–यांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/त्यांचा दुरध्वनी क्रमांक/महाविद्यालयांचा दुरध्वनी क्रमांक व घरचा पूर्ण पत्ता) स्वतंत्र पानावर लिहून जोडण्यात यावा.

15.11.18

कुलसचिव (प्र)
मुंबई विद्यापीठ

मुंबई – ४०० ०३२
१३ नोव्हेंबर, २०१८

प्रति :–

प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय (उपरोक्त संदर्भातील परिपत्रक व जोडपत्र विद्यापीठाचे संकेत स्थळ www.mu.ac.in वर उपलब्ध आहे.)

# मुंबई विद्यापीठ

सन २०१७–१८ करिता गुणवंत पुरस्कार, आपल्या महाविद्यालयातील शिफारस करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची खालील प्रमाणे सविस्तर माहिती दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०१८ पर्यंत सहाय्यक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागाकडे सादर करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | कर्मचाऱ्यांचे संपुर्ण नाव | |
| २. | सेवा पुस्तिका क्रमांक | |
| ३. | कर्मचारी संकेतांक क्र. | |
| ४. | महाविद्यालयातील कायमस्वरुपी तत्वावरील नियुक्तीचा दिनांक | |
| ५. | सेवेतील कालावधी वर्षे | |
| ६. | हुद्दा | |
| ७. | कार्यालयीन उपस्थिती : नियमित/अनियमित | |
| ८. | वर्तणुक | |
| ९. | कार्यालयीन कामकाजातील वक्तशीरपणा | |
| १०. | शिस्तभंगाची कारवाई अथवा ज्ञापन देण्यात आले आहे का? होय/नाही<br>असल्यास त्याबाबतची माहिती | |
| ११. | पोलीस अहवाल | |
| १२. | सेवेत असताना यापूर्वी पारितोषिक/बक्षिस प्राप्त झाले आहे का? होय/नाही<br>असल्यास सविस्तर माहिती देण्यात यावी | |
| १३. | प्राचार्य यांची शिफारस<br>महाविद्यालय सेवेत नाविन्यपूर्ण, कौशल्यपुर्ण आणि आदर्शवत केलेल्या कामाची सविस्तर माहिती देणे | |
| | | प्राचार्य<br>(महाविद्यालयाचा शिक्का) |